# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२**

## कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ५९, रूपये:- १,९२,७४,०००/-**<br>**श्री. अजित पवार,श्री. धनंजय मुंडे** |
| (१) | ४६४४ | १०० | ''चालू वर्षाच्या खरीप हंगामामध्ये खतांची टंचाई निर्माण झाल्यानंतर रब्बीत देखील खतासाठी शेतकऱ्यांना वणवण करावी लागत असल्याची बाब उघडकीस आलेली असणे, राज्यात १० २६ २६ आणि पोटॅश या खतांचा तुटवडा निर्माण झाल्यामुळे काळाबाजार आणि लिंकिंग सुद्धा मोठ्या प्रमाणामध्ये होत असून यात कृषी विभाग देखील हातावर हात धरून बसला असणे, परतीचा पाऊस लांबल्याने रब्बीच्या पेरण्या विलंबाने झाल्या असल्या तरी खताची पेरणी करण्यासाठी शेतकऱ्यांना खत उपलब्ध होत नसणे, राज्यात खतांचा काळाबाजार होत असल्याच्या प्रकरणी शासनाची झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' |
| (२) | ४६४७ | १०० | ''राज्यात कृषी विभागाच्या अंतर्गत यांत्रिकीकरणाच्या विविध योजनांमधून अवजारे व यंत्रे खरेदी केलेल्या १५ हजार शेतकऱ्यांचे अंदाजे ८७ कोटी रुपये अनुदान थकीत असल्याची बाब नुकतीच उघडकीस येणे, यामध्ये केंद्र पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण अभियानातील अंदाजे ४५ कोटी रुपये तर राष्ट्रीय कृषी विकास योजनेतील ४२ कोटी रुपयांचा समावेश असणे, परिणामी लाभार्थी शेतकऱ्यांच्या मनामध्ये शासनाच्या बाबत निर्माण झालेली नाराजीची भावना, यासंदर्भात शेतकऱ्यांचे थकीत अनुदान तातडीने वितरित करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.'' |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ६१, रूपये:- ७४,४२,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (३) | ४५३७ | १० | राज्यात फळपीक हवामानांमुळे धोक्यात येणे, हवामानावर आधारीत फळपीक लावण्याची गरज असणे,फळपीक विमा योजना राबविण्याची गरज असणे, संत्री फळपीक विमा संरक्षित रक्कम अचानक ३ पटीने वाढविली असणे, शेतकरी हवालदिल झाला असणे, ही बाब दि. ७/१०/२०२२ रोजी शासनाच्या निदर्शनास आली असण, विम्याची भरण्याची रक्कम ४ पटीने वाढविली असणे, याकडे शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक शेतकऱ्यांमध्ये नागरीकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: डी-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०१, पीक संवर्धन**<br>**बाब क्रमांक: ६२, रूपये:- ६,३०,०६,००,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (४) | ४७२८ | १० | राज्यात शेतकऱ्यांच्या पिकांची अतिवृष्टी, दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीमुळे पीकांचे नुकसान झालेले असणे, या पिकांना संरक्षण देण्यासाठी केंद्र शासनाकडून सन 2016 पासून पिक विमा योजना सुरू करणे, पिकांची पेरणी झाल्यानंतर शेतकऱ्यांनी प्रामाणिकपणे आपल्या पीकांचा विमा भरलेला असणे, अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाल्यावर सुद्धा शेतकऱ्यांना पीक विम्याची नुकसान भरपाई न मिळाल्यामुळे व काही ठिकाणी नुकसान भरपाई योग्य प्रमाणात न मिळाल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये शासनाप्रती प्रचंड रोष व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. माणिकराव कोकाटे** |
| (५) | ४६०३ | १० | राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२२-२०२३ चा पहिला हप्ता विमा कंपन्यांना प्रदान करण्यासाठी ६३० कोटी ६ लक्ष इतक्या रक्कमेची तरतूद केलेली असणे, किती क्षेत्राचा विमा काढला, नुकसान किती क्षेत्राचे झाले आणि किती क्षेत्राची नुकसान भरपाई मिळाली याची कुठलीही माहिती उपलब्ध न होणे, नाशिक जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेचे काम हे एच.डी.एफ.सी. अरगो या कंपनीला दिलेले असणे परंतु या कंपनीकडे पुरेसे मनुष्यबळ नसल्याने त्या कंपनीने ग्लोबल अर्क या कंपनीस सदरचे काम सोपवून प्रत्येक तालुक्यात एक प्रतिनिधी नेमून त्याला मनुष्यबळ उपलब्ध करून घेण्यास सांगणे पीक विमा काढणे, त्या पिकाच्या नुकसानीचे सर्वेक्षण करणे, पंचनामे करणे अशा पद्धतीने या पीक विम्याचे काम चालत असणे या कंपनीकडे कुठलाही प्रशिक्षित वर्ग उपलब्ध नसणे, एखाद्या शेतकऱ्याचे त्याच्या सर्व गटांचा विमा काढलेला असेल आणि सर्व गटाचे नुकसान झालेले असेल तर केवळ २ गटाची नुकसान भरपाई दिली जाणे, एकाच गावात शेजारी शेजारी असलेल्या एका गटाला एक निकष तर दुसऱ्या गटाला वेगळा निकष अशा पद्धतीने नुकसान भरपाई दिली जाने या पीक विम्याच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची असलेली आवशकता, शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची पूर्ण रक्कम अदा करणेची शासनाने घ्यावयाची जबाबदारी विम्याचा संपूर्ण लाभ मिळाला किवा नाही याची दक्षता घेणेसाठी तालुका निहाय लोकप्रतिनिधी यांचे समवेत समिती घटित करणेची असलेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (६) | ४७१९ | १० | राज्यात खरिपाच्या हंगामात सतत पाऊस व अतिवृष्टीने पीकांचे मोठे नुकसान झाले यासाठी विमा भरपाई मिळणे, क्रमप्राप्त असताना अमरावती जिल्ह्यातील बहुतांशी शेतकऱ्यांना पीक विम्याची भरपाई मिळाली नाही, अमरावती जिल्ह्यात पीक विमा कंपन्यांकडून वेळ काढूपणा व दिरंगाई होत असल्यामुळे शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ मिळत नाही, करीता अमरावती जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिक विमा भरपाई तातडीने देण्यात यावा, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. नितीन अर्जुन (ए.टी.) पवार** |
| (७) | ४६०४ | १० | राज्यात प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२२-२०२३ चा पहिला हप्ता विमा कंपन्यांना प्रदान करण्यासाठी ६३० कोटी ६ लक्ष इतक्या रक्कमेची तरतूद केलेली असणे, परंतु या विमा कंपन्या विम्याचा लाभ शेतकऱ्यांना देतात काय हा संशोधनाचा भाग असणे, किती क्षेत्राचा विमा काढला, नुकसान किती क्षेत्राचे झाले आणि किती क्षेत्राची नुकसान भरपाई मिळाली याची सविस्चातर माहिती देण्यास टाळाटाळ केली जाणे, नाशिक जिल्ह्यामधील कळवण-सुरगाणा आदिवासी मतदार संघात अद्याप पीक विमा नुकसान भरपाई मिळालेली नसणे, संबधित विमा कंपनीचे काम संथ गतीने सुरु आहे.वीमा कंपनी कडून शेतकऱ्यांना वेठीस धरणे पंचनाम्यावर कृषी सहाय्यकाची स्वाक्षरी ही कार्यालयात जाऊन घेणे आणि झालेले पंचनाम्यांचा डाटा वरील कंपनीला देणे अशा पद्धतीने या पीक विम्याचे काम चालत असून कुठलाही प्रशिक्षित वर्ग उपलब्ध नसणे, एखाद्या शेतकऱ्यांचे ६ गट असतील ६ गटांचा विमा काढलेला असेल आणि सर्व गटाचे नुकसान झालेले असेल तर केवळ २ गटाची नुकसान भरपाई दिली जाणे, एकाच गावात शेजारी शेजारी असलेल्या एका गटाला एक निकष तर दुसऱ्या गटाला एक निकष अशा पद्धतीने नुकसान भरपाई दिली जाने या पीक विम्याच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष देनेची असलेली आवशकता शेतकर्यांना नुकसान भरपाईची पूर्ण रक्कम अदा करणेची शासनाने घ्यावयाची जबाबदारी विम्याचा संपूर्ण लाभ मिळाला किवा नाही याची दक्षता घेणेसाठी तालुका निहाय लोकप्रतिनिधी यांचे समवेत समिती गठीत करणेची असलेली आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : २२ डिसेंबर, २०२२**

**राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर